

# प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज चरित्राची सुधारित - अवतरणिका



स्वामी श्रीचिन्मयानंद सरस्वती महाराज

''स्वामींनी नि:संकोच उच्चार केला। मीच देतो वेध दीक्षेला।
जागृत करतो कुंडलिनीला। घ्या केव्हाही अनुभव।।''




श्री. वामनरावजी गुळवणी महाराज


रचनाकार - अच्युत सिद्धनाथ पोटभरे

एम्.ए.बी.एड.

# प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती
# स्वामी महाराज



आम्ही दोघे एकचि आहे। सरस्वती संप्रदाय आहे।
कुंडलिनी योगमार्ग आहे। संप्रदाय सद्गुरुंचा ॥८८॥
तुझी उत्कट भक्ति पाहून। हे नाट्य आणिले घडवून।
निःसंकोच दीक्षा घेऊन। लोकोद्धारास लागावे ॥८९॥




श्रीगुळवणी महाराज यांना श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज (चिन्मयानंद सरस्वती)
यांची होशंगाबादेस शके १८४४ इ. स. १९२२–२३ साली दीक्षा झाली.
त्यासालच्या पंचांगाचे मुखपृष्ठ.

| शके १८४४ आश्विनकृष्णपक्षः | | | | | | | | | | | दि.पा.मु. | | | इं. | र.उ. | र.अ. | चंद्रः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गु | ६० | ० | रे | ५३ | २८ | ध्रु | ८ | ५९ | बा | ३० | २९/२० | २७ | १४ | ६ | ५.५३ | ५.४३ | ५३ नं. मे. |
| १ | श | २ | ५७ | अ | ५९ | १३ | व्या | १० | ८ | कौ | ३ | २४ | २८ | १५ | ७ | ५.५३ | ५.४२ | मेषः |
| २ | र | ७ | २२ | भ | ६० | ० | ह | १० | ४६ | ग | ७ | २२ | २९ | १६ | ८ | ५.५३ | ५.४१ | मेषः |
| ३ | चं | १० | २० | भ | ३ | ५२ | व | १० | ३३ | वि | १० | १९ | ३० | १७ | ९ | ५.५३ | ५.४० | २० नं. वृ. |
| ४ | मं | १२ | २४ | कृ | ७ | ४५ | सिं | ९ | २८ | बा | १२ | १६ | १ | १८ | १० | ५.५४ | ५.३९ | वृषभः |
| ५ | बु | १३ | २२ | रो | ९ | ५९ | व्य | ७ | २९ | तै | १३ | १४ | २ | १९ | ११ | ५.५४ | ५.३८ | ४० नं. मि. |
| ६ | गु | १२ | ५१ | मृ | ११ | १० | व | ४ | २८ | व | १३ | १२ | ३ | २० | १२ | ५.५४ | ५.३८ | मिथुनः |
| ७ | शु | ११ | ६ | आ | ११ | २१ | प | ०/५५ | २८/३ | व | ११ | ९ | ४ | २१ | १३ | ५.५५ | ५.३७ | ५५ नं. क. |
| ८ | श | ८ | १७ | पु | १० | ५ | सि | ४९ | ४३ | कौ | ८ | ७ | ५ | २२ | १४ | ५.५५ | ५.३६ | कर्कः |
| ९ | र | ४/५४ | ३५/५२ | पु | ७ | ५६ | सा | ४३ | १२ | ग | ४/२० | ४ | ६ | २३ | १५ | ५.५५ | ५.३६ | कर्कः |
| ११ | चं | ५४ | ३१ | आ | ५ | १ | शु | ३६ | १४ | व | २६ | २९/१ | ७ | २४ | १६ | ५.५६ | ५.३५ | ५ नं. सिं. |
| १२ | मं | ४८ | ५१ | म | १/५६ | ३२/३ | शु | २९ | १४ | कौ | २१ | २६/५९ | ८ | २५ | १७ | ५.५६ | ५.३४ | सिंहः |
| १३ | बु | ४२ | ४२ | उ | ५३ | ३१ | ब्र | २१ | ३ | ग | १६ | ५६ | ९ | २६ | १८ | ५.५६ | ५.३३ | १२ नं. क. |
| १४ | गु | ३६ | ४५ | ह | ४९ | २३ | ऐं | १३ | १७ | वि | १० | ५३ | १० | २७ | १९ | ५.५७ | ५.३३ | कन्या |
| ३० | शु | ३० | ४८ | चि | ४५ | २६ | वै | ५ | ३४ | च | ४ | २८/५१ | ११ | २८ | २० | ५.५७ | ५.३२ | १७ नं. तु. |

दि. मा. २८।५१ रा. मा. ३१।९

अमृतसिद्धिः ५३।२८

भ. प्र. ३८।५१ गुर्वस्तःपरे ५९।४

संकष्ट ४ चं. उ. क. ८ मि२५ करक४ भ. नि. १०/२०

चित्रार्कः ३२/३ १२ नं. दग्ध.†

[† आरदीवेहस्त.

मृत्युः १/३ १/० दग्ध. १/५ २/९ भ. प्र. १/५ २/१ भ. नि. ४१।४८

काला ८. ११ नं. दग्ध. मकरे भौमः २१।३७

८ नं. दग्ध. [*मु. ३० ऊर्ध्वः शोदयः पूर्वस्यां ३/४ ५/७ †

भ. प्र. ३/५ १/१ नि. ५९।१७ [† ति. वा. ६/७

रमा स्मार्त ११ दग्ध. ५४।३१

भागवत ११ गोवत्स १२ तुलायामर्कः १/२ ५ *

प्रदोषः शिवरात्रिः यमदीपदानं. धन १३†


नरक १४ भ. नि. १०।३ [† भ. प्र. ४/४ २/२

अभ्यंगस्नानं दर्शः ३०लक्ष्मीपूजनं मार्गाः ३/५ ७

दक्षिणायनं शरदृतुः


| र | चं | मं | बु | गु | शु | श | रा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ५ | ९ | ५ | ६ | ७ | ५ | ० |
| २ | २५ | ४ | २० | ८ | ९ | २२ | ५ |
| ४४ | ४६ | १६ | ४४ | २ | १९ | ३४ | २७ |
| १९ | ५० | ३२ | ४७ | ५३ | २६ | ५५ | ३४ |
| ५९ | ८५४ | ३८ | ८/२० | १२ | ३० | ७ | ३ |
| ५१ | ५२ | ३८ | व | ५२ | १७ | ५७ | ११ |

अ. १४ आ. कृ. ३० शु. प्रा.ग.
२४५६ च. घ. ३५




**प. पू. श्रीवामनराव गुळवणी महाराज यांच्या शक्तिपात दीक्षेचा दिवस**

**आश्विन व।। १२ – मंगळवार दि. १७ ऑक्टोबर १९२२ (भागवत एकादशीसह श्रीगुरुद्वादशी)**

॥ श्री गुरु:शरणम्॥

# प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज चरित्र

## अवतरणिका

ॐकार रूप होय व्यक्त। श्रीगुरुदेव दत्त ।
श्रीवासुदेव लोकनाथ। महाराज गुरु वंदितो ॥१॥
गणेश ब्रह्मा विष्णु शिव। लक्ष्मी सरस्वती कालीमाय।
गंगाधर नारायण देव। आत्मानंदा वंदितो ॥२॥
विष्णुतीर्थ शिवोम्तीर्थ। प्रेरणा तयांची समर्थ।
भक्त सकल कृतार्थ। कृतज्ञतेने वंदितो ॥३॥
गुरुपीठपरंपरा अपार। चतुराननासम थोर।
करितो सर्वांचा जयजयकार। ब्रह्माण्डभेद करोनी ॥४॥
आता अवतरणिका पाहू। हृदयसंपुटी जपून ठेऊ।
जेव्हा जेव्हा ती स्मरु। आत्मचैतन्या खुलवील ॥५॥
कालीमाता श्रीढाकेश्वरी। चक्रवर्तीकुल सर्वेश्वरी।
जगदोध्दारा कृपा करी। सुपुत्र योगेश देऊनी ॥६॥
वैशाख शुध्द द्वादशी। शके अठराशे चौदावे वर्षी।
हस्त नक्षत्र कन्या राशी। अमृतसिध्दी योग रविवारी ॥७॥
ढाकेश्वरी मंदिर दरबारी। योगबीज अधिकारी।
प्रगटले भारत भूवरी। सकल वर्षती पुष्पगुलाल ॥८॥

श्रीढाकेश्वरीचे हे पुजारी। निवास तिचिये मंदिरी।
योगेश रमे तिचे द्वारी। बाळलीला करीत ॥९॥
योगेश सदा आत्मरत। बसे कालीचे रूप बघत।
हृदयसंपुटी साठवित। व्यापक शक्ति अंतरी ॥१०॥
पितृछत्र लवकर मिटले। म्हणोनी शिक्षण थांबले।
आपत्तीचे चटके बसले। योगेश झाला मोकळा ॥११॥
श्रीढाकेश्वरीला शरण गेला। पुढील मार्ग दावी मला।
मन उदास प्रपंचाला। तूच माझी मार्गदर्शिका ॥१२॥
कालीमाता ढाकेश्वरीने। गुरु स्थान दाविले स्वप्नाने।
ओळख दिली दृश्यानें। आत्मानंद सद्गुरुंची ॥१३॥
स्वप्न संपताच सावध झाला। ब्राह्ममुहूर्ताच्या वेळेला।
ढाकेश्वरीला नमस्कार केला। योगेश पडला बाहेर ॥१४॥
वीसाव्या वर्षी घर सोडले। चितलकोटकडे पाय निघाले।
गुरुचे घरही दाखविले। स्वागता गुरु दारात ॥१५॥
स्वप्नाचा प्रत्यय आला। स्नेहाचा उमाळा आला।
परम ब्रह्म सूर्य भेटला। घेई लोटांगण गुरुचरणी ॥१६॥
पाठ थोपटून घरात नेले। क्षेमकुशल बोलणे झाले।
व्रतीचे नाव ठेविले। योगेश प्रकाश ब्रह्मचारी ॥१७॥
आत्मानंद गुरु तरुण। दोन वर्षाचे मोठेपण।
परी गुरु दीक्षा होताच साधन। शिवस्वरूपी पोहचले ॥१८॥
आत्मानंदास नारायण गुरु म्हणाले। तुझ्या साधनेने गुरुपद गाठले।
कोणास दीक्षा द्यावी वाटले। तर दीक्षा होईल सहज ॥१९॥
योगेशची उपरति पाहून। ढाकेश्वरीने पाठविले हे ओळखून।
त्यास दीक्षा द्यावी हे ठरवून। तयार केले अनुग्रहासी ॥२०॥

सारस्वत कुंडलिनी माता। अंतर्यामी निद्रित असता।
दीक्षेने  जागृत होता। मार्ग मोकळा होईल ।।२१।।
शुभमुहूर्त पाहून दीक्षा झाली। सुप्त शक्ति जागृत केली।
योगेशची शक्ति खुलली। योगक्रिया सुरू झाल्या ।।२२।।
गुरु–शिष्य दोघे निघाले। विनौटिया गावी आले।
नारायण परमगुरुस वंदिले। ज्ञानसाधन मठामाजी ।।२३।
एक सद्‌गुरु भेटता। परब्रह्म येई हाता।
येथे दोघेही दिसू लागता। योगेश नाचू लागला ।।२४।।
गुरुदृष्टीचा दंशु जाहला। क्रियाशक्तीचा वेग वाढला।
साधनेत अति जोर झाला। झंझावात महाप्रबल ।।२५।।
शक्ति सोडी मूलाधारा। साधका फिरवी गरगरा।
खालीवर येरझारा। घालू लागली ती माय ।।२६।।
योगेशाचे भान हरपले। क्रियाकर्म यंत्रवत् झाले।
धुंद आनंदाने तो डोले। हासे रडे स्वत:शी ।।२७।।
सर्व साधने साधकाहाती। महायोगसाधना उलटी गती।
साधकाची न चाले मती। साधने हाती साधक ।।२८।।
कल्पनातीत वस्तूसाठी। कल्पित साधन ते गोठी।
तेथ हवी 'ज्ञानसाधन' भेटी। श्रीसद्‌गुरुकृपाप्रसादे ।।२९।।
योगेश मठाची झाडलोट करी। भोजना होई आचारी।
दोन्ही गुरुंची करी चाकरी। मनी जाणोनी परम लाभ ।।३०।।
गुरु परमगुरु सेवा घडली। भवरोगावर शिळा पडली।
निरंजन नेत्रे उघडली। झाला कृतार्थ योगेश ।।३१।।
लाकडे फोडूनी, मागे भिक्षा। स्मरोनी घेतलेली दीक्षा।
प्रारब्धाची नको शिक्षा। म्हणोनि केला सत्संग ।।३२।।

योगेशचे वय लहान। घेतले व्रत महान।
ज्ञान साधन मठी राहून। अपार सेवा–साधन केले ॥३३॥
परमगुरु नारायण देव म्हणाले। योगेशचे साधन सुरेख चालले।
याने एकांती साधन केले। तर हा होईल पूर्ण महात्मा ॥३४॥
परमगुरुंचा आशीर्वाद घेऊन। काशीस निघाले दोघे जण।
ढाक्क्यास थोडे थांबून। महत्त्वाची कार्ये उरकली ॥३५॥
योगेशला पाठविले त्याचे घरी। मातेचा आशीर्वाद घेण्या सत्वरी।
गुरु राहिले त्रिपुरालिंग मठांतरी। या कार्याच्या सिद्धीला ॥३६॥
तो मठ मोठा, पसारा अफाट। शिष्य–सेवक–प्राप्ती बेफाट।
परी मठ स्वामी होते चिंतेत। पात्र उत्तराधिकारी मिळेना ॥३७॥
आत्मानंद गुरु तरुण। त्यांचा शिष्य गुरुसमान।
दोघे तेज:पूंज सूर्यासमान। मठस्वामींची आशा दुणावली ॥३८॥
स्वामी आत्मानंदांना म्हणाले। आमुचे आता वय झाले।
आपणास देवाने पाठविले। आपण व्हावे उत्तराधिकारी ॥३९॥
येथे काही कमी नाही। संपत्ति शिष्य समृद्धी सर्वही।
परि विरक्ती कोणात नाही। लोभी आसक्तांचा हा मठ ॥४०॥
आपण तृप्त विरक्त। शांत प्रसन्न योगयुक्त।
सात्त्विक साधनमस्त। आपण मठ सांभाळावा ॥४१॥
आपणास संन्यास देईन। मठ सिंहासनी बैसवेन।
सर्व अनुकूलता ठेवीन। मठाचे ऐश्वर्य वाढेल ॥४२॥
आत्मानंद गंभीर झाले। मठाची आसक्ती नाही म्हणाले।
हे कार्य बंधन होईल भले । आम्ही स्वयंभू बंधनमुक्त ॥४३॥
तरी मी शिष्याला सांगतो। संन्यास घे त्याला म्हणतो।
बघू काय उत्तर देतो। प्रपंची मुक्त होईल ॥४४॥

योगेश गुरुकडे मठी आला। गुरुने त्याला आग्रह केला।
संन्यास प्रकार सांग आईला। सहज संमति देईल ॥४५॥
योगेशने आईला सांगितले। ऐकून तिचे डोळे दिपले।
मठाचे पद चालून आले। घे संन्यास कुलदिपका ॥४६॥
'शुभस्य शीघ्रं' खरे झाले। योगेशप्रकाश संन्यासी झाले।
जीवन परिवर्तन घडले। चिन्मयानंद सरस्वती ॥४७॥
गुरुइच्छेने संन्यास घेतला। आधी शिष्य संन्यासी झाला।
आईचा आशीर्वाद लाभला । सिद्ध निर्दोष पवित्र ॥४८॥
घेऊनि साधनेचा ध्यास। बावीसाव्या वर्षी संन्यास।
काशी करून हृषिकेश। स्वामी आले टिहरीत ॥४९॥
तेथ अगाध साधन झाले। क्रियावेगमंद झाले।
नंदादीपा समान स्थिर झाले। चिन्मयानंद सरस्वती ॥५०॥
माता कुंडलिनीने आदेश दिला। स्वामी आता दक्षिणेस चला।
येथील कार्यभाग संपला। जगदोध्दारास लागावे ॥५१॥
हाचि मंत्र नित्य साधनेत। माँ कुंडलिनी सांगे कानात।
सतत सारखे येई मनात। दक्षिणेस आता चलावे ॥५२॥
आईचे शब्द प्रमाण मानूनी। स्वामी निघाले टिहरी सोडूनी।
काही न येई ध्यानी मनी। हथरस मुक्कामी थांबले ॥५३॥
टिहरीच्या दक्षिणेस आले। शिवालय मंदिर धाले।
स्वच्छ जलाशय पाहिले। स्वामी थांबले तेथे ॥५४॥
नित्यक्रम सुरू झाला। साधन रोज पहाटेला।
दुपारी गावात भिक्षेला। मंत्र कानी दक्षिणेचा ॥५५॥
साधन थांबू देईना। कोठे जावे ते कळेना।
तसेच आले रेल्वे स्थाना। बाकावरी बैसले ॥५६॥

श्रद्धाळूने नमस्कार केला। ''कहाँ जाना'' म्हणाला।
''दक्षिणको'' शब्द आला। गावाचा पत्ता नाही ।।५७।।
श्रद्धाळूला प्रेरणा झाली। स्वामींपुढे फळे ठेवली।
थोडी दक्षिणा पण ठेविली। हुशंगाबादच्या तिकिटासह ।।५८।।
आई मनी हासत होती। तिला नेण्याची घाई होती।
विश्व सूत्रधाराची गती। पळवितसे आईला ।।५९।।
स्वामी विचारी आईला। कोठे चालविले या वेड्याला।
सोडू नको मम हाताला। धरुनी नेई कोठेही ।।६०।।
स्वामींना आणिले हुशंगाबादेस। येथून लागे दक्षिण देश।
कर्मभूमी मुख्य वेस। प्रवेश द्वार दक्षिणेचे ।।६१।।
नर्मदा मातेचे तीर गाठले। स्नान पान करून तुष्टले।
मंगळवार घाटी राहिले। निर्जन मोकळ्या खोलीत ।।६२।।
विश्वमंचकाचा सूत्रधार। आहे खरा जादुगार।
सर्व हालचाली करणार। पडद्यामागे लपोनी ।।६३।।
असेच नवल दुसरे घडले। बार्शीहूनि महाराज आणिले।
खर्रा घाटावरी उतरविले। दत्तमंदिराजवळी ।।६४।।
रावबहाद्दूर परांडे यांना। माध्यम केले पहा ना।
शक्ति योजी युक्त्या नाना। वामन–स्वामी भेटीच्या ।।६५।।
स्वामींनी पिशाच्च उद्धरिले। परांडे तेथे भेटीस आले।
स्वामींना घरी भिक्षेस नेले। वेधदीक्षेचे विचारावया ।।६६।।
स्वामी प्रार्थना आहे एक। वेधदीक्षा देणारा ठाऊक।
असेल तर पुरवावी भाक। मी आहे जिज्ञासू ।।६७।।
स्वामींची तार लागली। आतून आईची आज्ञा झाली।
सांग संधी भली आली। वेधदीक्षा देतो म्हणूनी ।।६८।।

स्वामींनी नि:संकोच उच्चार केला। मीच देतो वेधदीक्षेला।
जागृत करतो कुंडलिनीला। घ्या केव्हाही अनुभव ॥६९॥
रावबहादुर सर्द झाले। शब्द ऐकताच गरगरले।
चाचपून स्वत:ला पाहिले। हे स्वप्न तर नाही ना ॥७०॥
विश्वगतीला वेग आला। मुक्याला शब्द फुटू लागला।
पांगळा चालू लागला। चिन्मयानंद–वाणीने ॥७१॥
स्वामी मुक्तानगरीचे जवाहिरे। पसरुन बसले मोती हिरे।
जाणारे येणारे घेणारे। पारखी कोणी आहेत का? ॥७२॥
पुण्यसंपदा गाठी नाही। श्रद्धेच्या तर गावी नाही।
जो तो या वेड्याला पाही। स्वत: शहाणा समजोनी ॥७३॥
स्वामींनी पाणी जोखले। काही मोती फुकट वाटले।
कुबेराचे भांडार भरले। होते झोळीत स्वामींच्या ॥७४॥
परांडे आपण मागे राहिले। नारायणप्रसादांना पुढे केले।
त्यांचे उत्तमानुभव पाहिले। महाराजां सांगाया ॥७५॥
अशाच काही दीक्षा झाल्या। सर्वांना क्रिया होऊ लागल्या।
महाराजांनी स्वत: पाहिल्या। विश्वास पक्का कराया ॥७६॥
जाणे येणे सुरू झाले। काका[१], बाबा[२] वैद्य[३] जमले।
स्वामी संगतीत रमू लागले। चिन्मयानंद सरस्वतींच्या ॥७७॥
बाबा महाजन योगी भले। दीक्षेसाठी आर्त झाले।
जाता जाता पावन केले। दीक्षा देऊनी स्वामींनी ॥७८॥
बाबांचे अनुभव पाहुनी। महाराज मनी पक्के करुनी।
प्रार्थना करुनी स्वामीचरणी। घरीच आपुल्या आणिले ॥७९॥
लोक नेती हिरेमोती। हे मात्र स्वामीच आणिती।
रत्नांची त्या काय क्षिति। रत्नभांडारी तो खरा ॥८०॥

१. शंकरकाका आजेगांवकर २. बाबा महाजन योगी ३. वैद्य मास्तर

मालमुलुक श्रीहरी देत। परि हरीजन हरीच देत।
जबर फरक ध्यानी घेत। आणिले घरी स्वामींना ।।८१।।
महाराज एके रात्री। टेंबे स्वामींना प्रार्थिती ।
महात्मा भेटले चिन्मयानंद सरस्वती। वेधदीक्षा देणारे ।।८२।।
आपण मला आदेश दिला। कर जागृत कुंडलिनीला।
अष्टांगयोग मार्ग दाविला। म्हणून आलो हुशंगाबादी ।।८३।।
खर्रा घाटावर उतरलो। श्रीदत्तमंदिरी राहिलो।
योगाभ्यासी लागलो। गोविंद पंडिता जवळी ।।८४।।
वेधदीक्षा देणारे गुरु भेटले। त्यांच्या दर्शने चित्त स्थिरावले।
काय करू सांगावे भले। खात्री द्यावी स्वप्नाने ।।८५।।
प्रार्थना करून महाराज झोपले। 'दत्त' म्हणत निद्रिस्त झाले।
त्या रात्री स्वप्नी आले। श्रीवासुदेवानंद सरस्वती ।।८६।।
नारायण म्हणत स्वामी आले। वामन महाराज जागे झाले।
श्रीचरणी मस्तक ठेविले। स्वामी आज्ञा श्रवणास ।।८७।।
आम्ही दोघे एकचि आहे। सरस्वती संप्रदाय आहे।
कुंडलिनी योगमार्ग आहे। संप्रदाय सद्गुरुंचा ।।८८।।
तुझी उत्कट भक्ति पाहून। हे नाट्य आणिले घडवून।
नि:संकोच दीक्षा घेऊन। लोकोद्धारास लागावे ।।८९।।
गुरुस्वामिंनी नि:शंक केले। विश्व नाट्याला बळ आले।
दुसरे नाट्य सुरू झाले। चिन्मयानंद सरस्वतींचे ।।९०।।
महाजनांचे अनुभव पाहिले। दीक्षा घेण्याचे पक्के केले।
महाराज स्वामींना म्हणाले। दीक्षा व्हावी गुरुदेवा ।।९१।।
चिन्मयानंद संतुष्ट झाले। शक्तीने येथवर का आणिले।
गूढ रहस्य उलगडू लागले। प्राप्त काल घडी आली ।।९२।।

होईल होईल दीक्षा होईल। वामना शक्ती जागृत होईल।
तुझी पुण्याई फळेल। श्रीदत्तगुरुदेव कृपेने ॥९३॥
नाट्यात नाट्य रुळले। केतकीच्या गुच्छात रुतले।
पानापानात लपले। बीजांकुरांचे सुगंधी तुरे ॥९४॥
पुनः महाराजांना स्वप्न पडले। चिन्मयानंद स्वप्नी आले।
वामन मस्तकी हात ठेविले। दीक्षा झाली स्वामींची ॥९५॥
जवळी प्रत्यक्ष असता। स्वप्नाने का दीक्षा देता।
माझ्यात काय कमतरता। मायेचा खेळ मांडला ॥९६॥
स्वामींना काही न वदले। स्वप्न मनीचे मनी ठेविले।
सत्याचे वेध लागले। उत्कंठा शिगेला गेली ॥९७॥
ती पहाट गुरुद्वादशीची। स्वप्नी देऊन दीक्षेची।
उभयतांच्या मौनाची। मनी ठेवीती तटस्थता ॥९८॥
अघटित घटनेचे सारे अघटित। दोघे परस्परांचा निर्धार पहात।
लघु गुरुच्या स्वधर्मात। परमोच्च स्थिती दोघांची ॥९९॥
त्याचदिवशी सायंकाळी। फिरावयास निघाली मंडळी।
नव्हती नित्याची खेळी मेळी। दोघे होते गंभीर ॥१००॥
कोठे थोडे चालू लागले। स्वामी मध्येच थबकले।
त्यांची मागे वळली पाऊले। घरी जावे म्हणोनि ॥१०१॥
ती केवळ स्वामींची इच्छा। कोणास वाटेना तुच्छा।
काही न करता पृच्छा। सर्व मागे परतले ॥१०२॥
तिघेजण[१] घरी आले। पलंगावर स्वामी बसले।
वामनाला म्हणाले। घे दीक्षा आत्ताची ॥१०३॥
वामन महाराज गडबडले। नमस्कार सुद्धा विसरले।
होते तेथेच बैसले। गुरुस्मरण करीत ॥१०४॥

१. शंकरकाका, महाराज आणि स्वामी

स्वामींनी छाटी सावरली। उभे राहिले करोनि साऊली।
सहस्त्री ठेऊनि करकमली। सोडिले श्वास जोरात ॥१०५॥
हार नाही दक्षिणा नाही। आसन दिशाचे भान नाही।
शरीराला तोल नाही। आसनी बसताच उडू लागले ॥१०६॥
महाशक्तीचा संचार झाला। पंचभूतांनी झंझावात मांडला।
कोंडलेला योग सोडला । जगदंबा कुंडलिनीने ॥१०७॥
कर्पास राशीस आग लागली। वामनमूर्ती उडू लागली।
थड् थड् थड् कंप पावली। क्षण मात्र न लागता ॥१०८॥
कुंडलिनीने मूलाधार सोडले। मेरुदंड घुसळून काढिले।
नागिणीने फुत्कार सोडिले। भस्त्रिका म्हणती योगिराज ॥१०९॥
नागिण भरभरा फणा हालवी। घूर्णा क्रिया तीच म्हणावी।
मस्तक भूमीला टेकवी। योगमुद्रा ती होय ॥११०॥
झटपट आसने होऊ लागली। बंध-मुद्रा मागे पडली।
शक्ति आता उसळू लागली। फुट्फुट् उडे मेंढक[१] ॥१११॥
क्रियांची कल्पना करवेना। काही करून आवरेना।
खोली सारी पुरेना। गोंधळ घातला कुंडलिनीने ॥११२॥
धुंदे कुंद चिन्मयानन्द। पाहती पुत्रोत्सव आनंद।
ऐसा एकचि पुत्र बेबंध। लोकनाथा आकळेना ॥११३॥
तासभरी साधन झाले। तेव्हा कुठे ते स्थिर झाले।
नागिणीचे पिल्लू दडले[२]। मूलाधारी जाऊन ॥११४॥
हळू हळू कंप सरला। लोचनी महापूर लोटला।
कंठ सद्गदीत झाला। महाराज गुळवणींचा ॥११५॥
जागेवरून ताडकन् उठले। स्वामी चरण घट्ट पकडिले।
गरम श्वास त्यावरी सोडिले। कृतज्ञता म्हणोनी ॥११६॥

१. बेडूक २. लपले

हार नाही दक्षिणा नाही। रिक्त हस्ता मिळेल का काही।
लाज वाटते मलाही। म्हणोनी क्षमा मागतो ।।११७।।
स्वामींनी पाठ थोपटली। आपुली दीक्षा आठवली।
अशीच रिक्त हस्ते घडली। सद्गुरु कृपा आगळी ।।११८।।
जात आपुली श्रीगुरुची। सदा देत राहण्याची।
काही एक न घेण्याची। दत्त आपुले गुरुदेव ।।११९।।
बोलावे काय ते कळेना। द्यावे काय ते कळेना।
करावे काय ते कळेना। मुक्याने गूळ चाखला ।।१२०।।
शरदऋतुचा काळ होता। नवरात्रोत्सव झाला होता।
गुरुद्वादशीचा दिवस होता। गुरुकृपेची फलप्राप्ती ।।१२१।।
वाडीची वारी कधी न चुकली। एकोणीशे सातात सुरू झाली।
पंधरा वर्षांनी वारी राहिली। परि घडले ते अघटित ।।१२२।।
अघटित घटनेचे सारेच अघटित। सर्व दीक्षा प्रभाती नियोजित।
वामन दीक्षा सायंकाली अवचित। पूर्ण प्रेरणा सद्गुरुची ।।१२३।।
स्वामींनी स्वप्नी दीक्षा दिली होती। महाराजांना तशी नको होती।
म्हणून दिनभर गप्प राहती। ईश्वरी जादू पहावया ।।१२४।।
अहो तो दिवस गुरुद्वादशीचा होता। दीक्षेसाठी तो त्यांना हवा होता।
परी स्वामींनी काही न सांगता। स्वप्न दीक्षा का दिली ।।१२५।।
म्हणून हे अघटित घडले। कोणास काही न कळले।
शास्त्र विधी कोसळले। माहात्म्य हे गुरुद्वादशीचे ।।१२६।।
पहिल्या गुरुची पहिली भेट। वाडीला गुरुद्वादशीस थेट।
मालांकित हाराची दत्तभेट। मंत्र पेटी वामना हाती ।।१२७।।
त्यासाठी वार्षिक वारी। व्रत म्हणून अंगिकारी।
त्यात आहे दीक्षेची थोरी। दीक्षा दिनाचे श्रद्धा केंद्र ।।१२८।।

राजविद्येचे राजगुह्य। कधी न प्रगटले बाह्य।
हेचि अव्यक्त ध्येय। वामनाने सांभाळिले ॥१२९॥
दीक्षा दिनाचे महत्त्व आगळे। खरा शिष्य श्रद्धेने पाळे।
त्याचे हृदय भोळे। अनन्य निष्ठा ही खरी ॥१३०॥
महाराजांचे गुरु दोन। दोघांच्या दीक्षा दोन।
परी अभिन्नता ठेवून। दीक्षा दिन दोन्ही पाळले ॥१३१॥
स्वामींची मंत्रदीक्षा पवनीला। झाली अनंतचतुर्दशीला।
प्रति वर्षी साजरा केला। पवमानरुद्र पठनाने ॥१३२॥
नवी वेधदीक्षा द्वादशीला। झाली ती हुशंगाबादेला।
दीक्षादिन पालन वाडीला। प्रतिवर्षी हो केले ॥१३३॥
काय वर्णावे श्रीगुरुमहाराज। योगीराजांचे योगिराज।
दत्तावतारी श्रीपाद राज। उमामातेचे सुपुत्र ॥१३४॥
स्वामींना उलगडा झाला। दक्षिणेस का पाठविले मला।
असा हा दिव्य शिष्य भेटला। दीक्षा कर्ता जगद्गुरु ॥१३५॥
हुशंगाबादेची दीक्षा अलौकिक। त्या साऱ्या घटना अलौकिक।
गुरुद्वादशीचे अनुभव अलौकिक। मंत्रमुग्ध श्रद्धेने पहावे॥१३६॥
त्याच पहाटे स्वप्न दीक्षा। सायंकाळी स्पर्श दीक्षा।
अनुभवांनी ओलांडिली कक्षा। सारेच कल्पनातीत ॥१३७॥
तो दीक्षा दिन वाडीत प्रतिवर्षी। साजरा केला सर्व साक्षी।
श्रीपाद वामन रक्षी। श्रीपाद वल्लभ दिगंबर ॥१३८॥
पुढील अवतरणिका पाहू। हुशंगाबादेच्या दक्षिणेस जाऊ।
वामन–स्वामीं बरोबर राहू। त्यांच्या जीवन ज्योतीसह ॥१३९॥
मग स्वामी दक्षिणेत घुसले। महाराष्ट्राच्या अंतरी आले।
महाराजांच्या येथे राहिले। बार्शी पुण्यास विशेष ॥१४०॥

स्वामी जसे आत आले। शिष्यश्रेष्ठत्व कळो आले।
सद्‌गुणांचे भांडार भरले। महाराज अंतरी ॥१४१॥
जो तो त्यांना मान देई। त्यांच्या शब्दाबाहेर नाही।
सद्‌गुण सुगंधाच्या जाईजुई। भोवती महाराजांच्या ॥१४२॥
विचार शुद्ध –आचार शुद्ध । भाव शुद्ध – वर्तन शुद्ध।
आत बाहेर शुद्धच शुद्ध। स्फटिक कर्पूरा लाज वाटे ॥१४३॥
स्वामींनी सर्व ताडले। हुडकुनी निमित्त काढिले।
दीक्षा सर्वस्व देऊन टाकले। परम शिष्या वामना ॥१४४॥
स्वामी होते उज्जयनीस। दीक्षा झाली बार्शीस।
गोपिकाबाई सौभाग्यवतीस। भाग्यश्री महाराजांहस्ते ॥१४५॥
शक्तिपातयोग परंपरा। वाढू लागली झरझरा।
पसरला तिचा पसारा। गंगाधरतीर्थ आशीर्वादे ॥१४६॥
तिकडे काशीस असे घडले। स्वामींचे गुरु संन्यासी झाले।
शंकरपुरुषोत्तमतीर्थ बनले। दण्डधारी यतिराज ॥१४७॥
स्वामींना ही वार्ता कळली। धावत जाऊन काशी गाठली।
संन्यासी यतिवेष माऊली। वंदूनी केली प्रार्थना ॥१४८॥
आपण आमचे गुरु महाराज। आजपर्यंत राखली लाज।
दण्डधारी यतिराज। आम्हा करावे दण्डधारी ॥१४९॥
भक्ताधीन सद्‌गुरु। कसे तुला मी नाकारु।
गयेचा आता पंथ धरु। तेथे होशील दण्डधारी ॥१५०॥
गयेस दण्डग्रहण झाले। चिन्मयानंद दण्डी झाले।
लोकनाथ नाव ठेविले। शंकर पुरुषोत्तम गुरुराये ॥१५१॥
स्वामी श्रीलोकनाथ तीर्थ। नाव झाले जगप्रसिद्ध।
शक्तिपात स्वामी सिद्ध। जयजयकार करू त्यांचा ॥१५२॥

श्रीलोकनाथ पुण्यास आले। जिकडे महाराज तिकडे गेले।
'वीस नारायण' मध्ये आले। नारायण नारायण म्हणत ।।१५३।।
स्वामी चैतन्याचा पुतळा। उमा[1] गोदा[2] झाल्या गोळा।
महाराज पाहती सोहळा। रोमांचित होऊनी ।।१५४।।
त्या छोट्या खोलीत नेले। खिडकीपाशी आसन घातले।
त्यावर स्वामींना बैसविले। सर्वही घेती दर्शना ।।१५५।।
दर्शना एक तरुण आला। गोरागोमटा होतकरु दिसला।
हा कोण म्हणून प्रश्न केला। स्वामींनी महाराजांना ।।१५६।।
याचे नाव भुजंगराव। भालेराव असे आडनाव।
सोडून आले डोणजेगाव। स्नेही आमचे शेजारी ।।१५७।।
इकडची आवड आहे। सर्व लक्ष इकडे आहे।
लक्ष्य देऊनी पाहात आहे। काय येथे चालले ।।१५८।।
स्वामी आपण त्याकडे पहावे। आपले करून टाकावे।
मला क्षणभरी न राहवे। म्हणून शब्द टाकला ।।१५९।।
भुजंगरावांना दीक्षा झाली। स्वामींनी कृपा केली।
पुण्यामधील ही पहिली। दीक्षा असे स्वामींची ।।१६०।।
त्यांचे साधन शांत असे। बाह्य हालचाल दिसत नसे।
सर्वत्र आरक्तता दिसतसे। ही खूण शक्तिजागृतीची ।।१६१।।
स्वामींनी आशीर्वाद दिला। महाराज आहेत संगतीला।
हा लाभ दुर्लभ इंद्राला। आयुष्यभरी विसरू नकोस ।।१६२।।
स्वामीशब्द पकडून। इस्टेट दिली सोडून।
मनीच्या वासना मारून। ठेविले ठाण श्रीचरणाठायीं ।।१६३।।
भक्त नसतो विभक्त। भक्त तेथे दत्त।
महाराज आणि लोकनाथ। एकेच ठायी सापडती ।।१६४।।

१. महाराजांची आई २. महाराजांची बहीण

भुजंगराव हे पाहात। हर्षनिर्भर होत।
देवदुर्लभ ही मात। प्राणापलिकडे सेविती ॥१६५॥
सतत शिष्य वाढू लागले। अविद्या दिग्गज मागे सरले।
ब्रह्मविद्येचे साम्राज्य वाढले। स्वानंद–सम्राट स्वामींचे ॥१६६॥
संकल्प महापुरुषाचा। मार्ग हा शक्तिपाताचा।
दिव्य स्फुल्लिंग चैतन्याचा। विश्वभर पसरेल ॥१६७॥
स्वामी काशीस आले। गुरुमहाराजांना भेटले।
नवल जे होते दाटले। कथिले शंकर पुरुषोत्तम गुरुंना ॥१६८॥
काशीत गुरुंचा आश्रम झाला। 'सिद्धयोगाश्रम' नाव तयाला।
त्या वास्तूच्या उद्‌घाटनाला। स्वामी छोटी गैबीत ॥१६९॥
स्वामी गुजराथेत वळले। तेथे भगवंतराव भेटले।
दुर्धर व्याधिने व्यापले। दीक्षित ते महाराजांचे ॥१७०॥
कर्मकहाणी सर्व सांगितली। वामन गुरुने फुंकर घातली।
परि स्वामीकृपासाऊली। करावी या दीनावर ॥१७१॥
म्हणोनी स्वामी तिकडे गेले। थुरावासात महिना राहिले।
दुर्धर व्रण सुकू लागले। दुष्काळातील जलापरी ॥१७२॥
वर्षाची होती मर्यादा। गुरुमुखातून आल्या शब्दा।
नियती थबकली कितीकदा। शब्द मर्यादा सांभाळीत ॥१७३॥
स्वामी तुष्टले भगवंतांवरी। घेई सेवा मासभरी।
तेथोन मारली भरारी। परम कृपा करोनी ॥१७४॥
स्वामी परत पुण्यास आले। शंकरराव मार्कंड भेटले।
जीवाभावाचे भक्त जाहले। आयुष्यात स्वामींच्या ॥१७५॥
एम्.ए.एल्.एल्.बी. होते। तरी वकिली करीत नव्हते।
रेस मध्ये 'बुकी' होते। स्वामीआज्ञेप्रमाणे ॥१७६॥

स्वामींनी मर्यादा घातली। येथून सहा वर्षे झाली।
म्हणजे बुकीची जागा खाली। काही केल्या करावी ॥१७७॥
स्वामी आज्ञेने चालले। शंकरराव बुकी झाले।
संपत्तीचा पाऊस चाले। मुसळधार हत्तीचा ॥१७८॥
पहिले दिवशी हजार आले। दुसरे दिवशी पाच हजार झाले।
हजारांचा पाढा चाले। लक्ष्मीचा रोज घरात ॥१७९॥
एकदा तर वीस हजार आले। शंकरराव पहातच राहिले।
काही न करता पैसे आले। स्वामीकृपा अफाट ॥१८०॥
मार्कंड होते दत्तभक्त। पारणे, पारायणे थाटात।
समारंभ असे गर्जत। घरी शंकररावांच्या ॥१८१॥
ऐंशी हजारांचा बंगला घेतला। वाहन सौख्या तोटा कसला।
गडी माणसांचा गलबला। तोटा नसे परिवारा ॥१८२॥
याहून एक विशेष असे। स्वामिभक्तित उणे नसे।
होईल ते ते करीतसे। स्वामींसाठी उदार हस्ते ॥१८३॥
स्वामींच्या यात्रा केल्या। बद्रीनारायणा दंड्या केल्या।
खास रेल्वेगाड्या झाल्या। ऐश्वर्याच्या ऐपतीने ॥१८४॥
काशीत एक आश्रम बांधला। दहा हजार रुपये खर्च केला।
स्वामीचरणी दान केला। गुरुभक्तीचा कळस ॥१८५॥
असे भक्त मार्कंड। जणू प्रतापी मार्तंड।
यासी झाला असे दंड। प्रारब्धाच्या गतीने ॥१८६॥
वर्षे लक्षात राहिली नाही। पैशाचा मोह थांबला नाही।
काय झाले ते कळले नाही। फटका लाखाचा बसला ॥१८७॥
शंकरराव हादरले। घामाने शरीर दरदरले।
काळीज टर्रकन फाटले। कंठशोष जाहला ॥१८८॥

या फटक्याला उपाय नाही। रेसशिवाय पैसा नाही।
आता दुसरी धडगत नाही। करी तोटा दुप्पट ।।१८९।।
स्वामींना फार वाईट वाटले। होणारे ते कधी न चुकले।
जाणीव देऊनी सावध केले। परि प्रारब्धा गती आगळी ।।१९०।।
स्वामींनी आश्रम विकला। सोळा हजार किंमतीला।
तो पैका पाठवला। मार्कंडांना सावरण्या ।।१९१।।
स्वामींची ही वृत्ती पाहून। शुकाचार्य वदले लाजून।
आज आमचेवरी ताण। लोकनाथांनी हो केली ।।१९२।।
भले भले संन्यासी जाहले। डोंगर कपारी राहिले।
विरक्तिचे टेंभे मिरविले। योजने दूर वासनेच्या ।।१९३।।
परी लोकनाथांचे आगळे। वासनेच्या ज्वाळी लोळे।
लोभजळे घोळे मळे। पूर्ण कोरडा दगडापरी ।।१९४।।
विरक्तिला लाज वाटली। लोकनाथांची मी बटुकली।
मी तर त्यांची साऊली। राहिली प्रसिद्धीपराङ्मुख ।।१९५।।
गंगा हिमालय काशी। स्वामी तेथील निवासी।
भक्तहृदयवासी। परत आले काशीत ।।१९६।।
भेटले भक्त जांबवंत। जणू भक्त शिरोमणी हनुमंत।
महाराजांचा शिष्य म्हणत। करी सेवा स्वामींची ।।१९७।।
भाग्य जांबवंत सिंहाचे। परम गुरुच्या सेवेचे।
शब्द वामन श्रीगुरुचे। स्वामी सेवा करावी ।।१९८।।
सेवा सिंहाची पाहून। संदीपकाची होते आठवण।
स्वामी सेवा अति कठीण। पहा प्रसंग अनेक ।।१९९।।
स्वामी व्याधींनी पीडले। रोग अनेक उद्भवले।
प्रारब्ध म्हणोनी भोगले। उपाय काही न करता ।।२००।।

स्वामींचे दु:ख पहावेना। जांबवंत उसंत घेईना।
सेवा करीत असे नाना। धिटाईने स्वामींची ॥२०१॥
सेवा स्वामी घेत नसे। बोलत बसती हवे तसे।
कफे गळा दाटतसे। डोळे वटारुनी पाहती ॥२०२॥
पुढे जाता हुसकुन देती। तुझी दु:खे मला येती।
तुझ्यामुळे माझी ही गती। चालता हो येथून ॥२०३॥
जांबवंताने ऐकावे। स्वत:ला बहिरा समजावे।
स्वामींपुढे पुन्हा जावे। सेवा काही करावया ॥२०४॥
स्वामी औषध नको म्हणती। दिले तरी फेकून देती।
तू नको माझ्यापुढती। फिरून का आलास? ॥२०५॥
असे स्वामी वेदधर्मामुनी। लावून बसले धुनी।
जाळीत राहिले प्रारब्ध गहनी। जांबवंताच्या आधारे ॥२०६॥
एकदा सकाळी जांबवंत आला। स्वामी दिसेना जागेला।
हृदयात गलबला झाला। स्वामी कोठे म्हणोनी ॥२०७॥
त्यांचेच स्मरण करोनी। दवाखाना पहावा म्हणोनी।
पळत निघाला अनवाणी। ठिकाण ते गाठले ॥२०८॥
तेथे स्वामी बसले होते। दुखण्याचे धक्के बसत होते।
ओरडले पाहून जांबवंताते। "यमा येथे आलास का?" ॥२०९॥
खाली जाऊन उभा राहिला। काय करावे या दैवाला।
सेवा करू देईना मला। प्राण देवा घे माझे ॥२१०॥
जांबवंत झाडाआड थांबले। रिक्षातून स्वामी गेले।
ते चोरून त्याने पाहिले। सुटला मागे धावत ॥२११॥
रिक्षा जाईना गल्लीत। जाता येईना घरात।
स्वामी तेथेच खाली बसत। गोळामोळा होऊनी ॥२१२॥

जांबवंत धावत आला। स्वामींनी बघितले त्याला।
चेहरा त्यांचा प्रसन्न झाला। सेवेवर तुष्टले ।।२१३।।
गुरुस्वामी खांद्यावर घेतले। श्रावणबाळापरी चालले।
काशीत काशी यात्रा चाले। धन्य धन्य जांबवंत ।।२१४।।
स्वामींना मठीत आणले। आसनावरी बसवले।
हात पाय चेपले। रेशमी हृदयाच्या हाताने ।।२१५।।
असे हे जांबवंत। म्हणोनी म्हणावे हनुमंत।
हे होत खरे संत। चरणी त्यांच्या नमस्कार ।।२१६।।
स्वामींचे चरित्र अपार। भरलेला चैतन्य सागर।
उपसणारा किती उपसणार। त्या सागरी डुंबूया ।।२१७।।
वामनाला काशीस आणले। छोटी गैबीत गुरुकडे नेले।
कौतुक नातवाचे केले। "शिष्य आमचा प्रपौत्र" ।।२१८।।
शक्ति खेळवी स्वामीला। स्वामी भुलवी शक्तिला।
कोणी सोडीना दुसऱ्याला। शिवशक्तीचा खेळ असा ।।२१९।।
भारतभर स्वामी हिंडले। जडजीव उद्धरिले।
मोक्षमार्गीचे केले। अक्षय शक्ति देऊन ।।२२०।।
शिष्य नीलकंठ वत्सराज। स्वामीकृपेचे तेज।
पाहून वाटते चोज[१]। एम्. ए. परीक्षा काळात ।।२२१।।
रस्त्यात एक गाय पडली। कोणाला ती उठू न शकली।
परी स्वामींनी ती उठवली। कृपाकटाक्षे पाहून ।।२२२।।
माकडाने छाट्या फाडल्या। शिष्यांनी नव्या आणल्या।
स्वामींना या चेष्टा कळल्या। माकडे शांतविली शब्दाने ।।२२३।।
मृत्युचे दिवस सांगितले। दुष्ट डबडे उघडे केले।
संकटात वाचविले। अगणित घटना स्वामींच्या ।।२२४।।

१. आश्चर्य

चमत्काराशी वैर धरले। वैर धरुनी चमत्कार केले।
घटनेपासून दूर राहिले। म्हणोनी स्वामी संन्याशांचे ।।२२५।।
जो जो त्यांच्याजवळ गेला। लाल घोटित बसून राहिला।
त्यांच्या तंद्रीत रंगला। देहभान हरपोनी ।।२२६।।
नारायणराव देशपांडे। किर्लोस्कर, मोघे आणि बेंद्रे।
गुरुभक्तिचे नाचवी झेंडे। होती धुंद स्वामी सेवे ।।२२७।।
बाळासाहेब वाकडे। शब्द पडती तोकडे।
स्वामीसेवेचे धडे। त्यांचेपासून गिरवावे ।।२२८।।
नारायणराव ढेकणे। निरंजनाचे देखणे।
लेऊन बैसले लेणे। परमकृपेने स्वामींच्या ।।२२९।।
खेर, जाधव, सोवनी। भालू, नारायण, योगेशनी।
स्वामीसेवा करूनी। कृतार्थ केले आयुष्या ।।२३०।।
प्रल्हादशास्त्री बार्शीचे। नेतृत्व घेऊन सर्वांचे।
दान दिले सेवेचे। संतोष झाला स्वामींना ।।२३१।।
पराडकर धन्वंतरी। औषधे पाठवली वरचेवरी।
स्वामी असता काशीपुरी। स्वामीसेवा आगळी ।।२३२।।
व्यंकू, बापू आणि भास्कर। घेऊन वामन दीक्षा क्रमवार।
सेविले स्वामी गुरुवर। लक्ष ठेऊनी अनेकदा ।।२३३।।
काशीचे शिष्य कितीतरी। स्वामीशिष्यांनी भरली नगरी।
भारताच्या कडेकपारी। उल्लेख आहे ग्रंथात ।।२३४।।
भक्तनामाचा विस्तार। मी मंदमति किती करणार।
जो काही झाला येथवर। स्वामी इच्छा म्हणोनी ।।२३५।।
आणिक अनेक राहिले। ते स्वामी नावात आले।
हे समजून ते भले। क्षमा करतील दासाला ।।२३६।।

स्वामींना मृत्युची चाहूल लागली। भराभरा पत्रे लिहिली।
मृत्युंजयापरी ती भासली। शिष्य जमले काशीत ॥२३७॥
'तो' क्षण जवळी आला। ऊर्ध्व श्वास सुरू झाला।
शिष्यांनी श्वास रोखला। स्वामींसाठी तेधवा ॥२३८॥
धाऊन आले विश्वनाथ। हा तर प्रत्यक्ष सिद्धनाथ।
लोक म्हणती लोकनाथ। मृत्युला भय याचे ॥२३९॥
शिवाची सत्ता मृत्युवरी। त्यातून ही काशीपुरी।
विश्वनाथाच्या आज्ञेवरी। मृत्युचे काय चालते? ॥२४०॥
स्वामी संकट संपले। शिष्य सर्व पांगले।
स्वामी झाले चांगले। सांगती आपल्या बंधूंना ॥२४१॥
भक्तांचा देव गुरु। गुरुचा देव भक्त थोरु।
हा करून विचारू। घेतले दर्शन स्वामींनी ॥२४२॥
जाण्याचे जेव्हा ठरविले। त्याच्या तीन दिवस पहिले।
जांबवंतास बोलविले। सूचना काही सांगण्या ॥२४३॥
लक्ष्मणशास्त्री आणि जांबवंत। स्वामी आज्ञेने आले धावत।
घालून साष्टांग दंडवत। कर जोडोनी ठाकले ॥२४४॥
आता आम्ही जातो। तुम्हास काही सांगतो।
विश्वास तुमचा वाटतो। म्हणुनी तुम्हा बोलाविले ॥२४५॥
दगडाची पेटी करावी। त्यात ही देहतुलसी ठेवावी।
घट्ट बांधून गंगार्पण करावी। शिवनामाच्या गजरात ॥२४६॥
मी कालीभक्त पूर्वाश्रमीचा। छंद तिच्या पूजेचा।
ही पुरवावी इच्छा। कुमारीका पूजोनी ॥२४७॥
माझी उत्तरक्रिया अशी करा। महाराष्ट्रीय ब्राह्मणद्वारा।
नारळ फोडूनी मस्तकी करा। ब्रह्मरंध्र मोकळे ॥२४८॥

जाऊन सिद्धयोगाश्रमात। भंडारा घाला सर्वांना तेथ।
वस्त्र दक्षिणा देऊन बहुत। तुष्ट करा संन्यासी ॥२४९॥
मी नव्हे, जाते शरीर। आता झाले जर्जर।
चैतन्य तेजाच्या बरोबर। राहतो तुमच्या हृदयात ॥२५०॥
जेव्हा जेव्हा मज स्मराल। तेव्हा तेव्हा मज पहाल।
सुखतंद्रीत डोलाल। आण माझी सांगतो ॥२५१॥
स्वामींनी हा निरोप घेतला। दोघांना[१] तेव्हा चटका बसला।
जांबवतांने तर धसका घेतला। स्वामींच्या या शब्दांनी ॥२५२॥
जांबवंताला रडू आवरेना। बाहेर परी दिसू देईना।
आवडणार नाही स्वामींना। झाला कष्टी गंभीर ॥२५३॥
रविवारी हा प्रकार झाला। दिवस बुधवारचा उजाडला।
स्वामी खिळले अंथरुणाला। पद्मासनी बैसविले ॥२५४॥
माघ वद्य तृतीया होती। मध्यरात्र उलटली होती।
चिन्मयस्वामी देह सोडती। ॐकाराच्या स्वरात ॥२५५॥
देहसंबंध सुटला। बंधनाचा मार्ग खुंटला।
चिन्मयानंदात नटला। मुक्तात्मा जीवन्मुक्त ॥२५६॥
स्वामी श्रीलोकनाथतीर्थ। सार्थ जीवन होई कृतार्थ।
शक्तिपातपथ करिती समर्थ। देव करिती पुष्पवृष्टी ॥२५७॥
शिष्यनिर्वाण वृत्त ऐकले। शंकर पुरुषोत्तम स्तब्ध झाले।
मुखातून त्यांच्या शब्द आले। "पूर्ण प्रतापी महात्मा" ॥२५८॥
गुरु योगानंद वदले। चार तपे लोकनाथ पहिले।
निष्कलंकित ते मी अनुभवले। पापविनाशी भागिरथी ॥२५९॥
महाराज पुण्यात होते। गुरुचरित्र सप्ताह वाचीत होते।
गुरुवारी करून समाप्ती ते। तार घेती हातात ॥२६०॥

१. लक्ष्मणशास्त्री वैद्य आणि जांबवंत सिंह

गुरुचरित्र समाप्ती झाली। त्यांची ती तार वाचली।
वामनमूर्ती मटकन् बसली। अवतरणिका स्मरत ॥२६१॥
श्रीलोकनाथ चरित्र अवतरणिका। श्रीगुरुलीला स्मरणिका।
मुक्त करील कारणिका। बंधनातून मायेच्या ॥२६२॥
साधनेतील सर्व विक्षेप। वाचता घालविल साक्षेप।
आवर्तन करून करा बैठक। पहावा अनुभव घेवोनी ॥२६३॥
विशेष अनुभव येतील। शक्ति वरवर चढेल।
चित्तचांचल्य सरेल। अवतरणिकेच्या पठणाने ॥२६४॥
आनंदसागरी बुडाल। तंद्रिची धुंदी चढेल।
साधनेची भूक वाढेल। सारे मल खावया ॥२६५॥
न मागता मोक्ष मिळेल। न ठरविता खूप होईल।
सहजची साध्य साधाल। साधनभक्ति गुरु कृपा ॥२६६॥
गुरुतत्वावर चित्त राहील। संक्षेप कर्मांचा होईल।
स्वामींचा दास शोभाल। चित्त, वाणी, कृतीने ॥२६७॥
ग्रंथ पठणाने एवढे होईल। परि अधिकाची इच्छा असेल।
तीव्रता असेल प्रबल। तरी पुढील अनुष्ठान करावे ॥२६८॥
अवतरणिका सतत म्हणावी। झाली तर पाठ करावी।
जाता येता वदावी। स्वामींचे शब्द म्हणोनी ॥२६९॥
नमूनी गुरुपीठ – परंपरेला। प्रार्थना महाराज स्वामीला।
शब्द खरा करा आपुला। भक्तवत्सल व्रतधारी ॥२७०॥
आपण जे करून घेतले। ते आपल्याच ठायीं ठेविले।
ठेव ठेवता चरण सापडले। माथा टेकवी अच्युत ॥२७१॥

॥ इति श्रीलोकनाथतीर्थ चरित्र अवतरणिका,
श्रीगुरुदेव – दत्तात्रेयार्पणमस्तु॥

# श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांची आरती

(चाल – आरती ज्ञानराजा....)

आरती लोकनाथा, स्वामी सद्‌गुरुनाथा,
नमितो तुज दत्ता, देई दर्शन आता
आरती लोकनाथा ।।ध्रु.।।

व्यापिली चराचरी, सुप्तशक्ति ती करी
घेऊनि दान करी तव कृपे संचरी
अनुभव ये हाता, स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ।।१।।


दिधली गंगाधरे, नारायणा स्वहाते
कृतार्थ ते होती उद्धरती जगाते
करुनी शक्तिपाता – स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ।।२।।

देती ती आत्मानंद, होती चिन्मयानंद
स्वामी श्रीलोकनाथ, आम्हा करीती कृतार्थ
काय वानुं तुज आता, स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ।।३।।

सद्‌गुरु महाराजा, महा कैवल्य तेजा
घेऊन तुझी ध्वजा, विश्वा दावी स्वतेजा
योगिराज समर्था, स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ।।४।।


प्रवाह गंगेपरी, भिक्षा लघुत्वाचि घेई
गुरुत्वाचे दान करी, दासाधरी अंतरी
अच्युता, लोकनाथा, स्वामी सद्‌गुरु नाथा
आरती लोकनाथा ।।५।।

# सद्‌गुरु श्री गुळवणी महाराज



'भक्ती' ईशतत्त्वीं आकर्षण। 'योग' समचित्ताचे आचरण।
'कर्म' शुद्धीचे प्रक्षाळण। सद्‌गुरु ठायी एकवटले।।

# प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज



अखंडानंद रुपाय चिदानंदात्म रुपिणे।
चिन्मयानंद रुपाय श्रीलोकनाथाय नमो नमः।।